महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्र.मऔविम/मा.तं.विभाग/ D - 76436

"उद्योग सारथी"
मरोळ औद्योगिक क्षेत्र
महाकाली गुंफा मार्ग
अंधेरी(पूर्व),मुंबई-९३
दिनांक :- 25/11/2016

परिपत्रक

**विषय : मरोळ ,ठाणे (वागळे इस्टेट) व टी टी सी औद्यौगिक क्षेत्र येथील माहिती तंत्रज्ञान उद्यानातील भूखंड/युनिट माहिती तंत्रज्ञान व्यतिरिक्त इतर औद्योगिक प्रयोजनाकरीता हस्तांतर/सबलीज/पोटभाडे/वापरातील बदलास परवानगी देणेबाबत....**

**संदर्भ**
**१. परिपत्रक क्र. मऔविम/सहमुकाअ(मा/तं)/५८६/२०१० दिनांक १२.१०.२०१०**
**२. परिपत्रक क्र. मऔविम/माहिती तंत्रज्ञान विभाग/ए९४१९०/२०१३ दिनांक २५.०३.२०१३**
**३. परिपत्रक क्र. मऔविम/माहिती तंत्रज्ञान विभाग/सी-७८७६४/२०१४ दि. ०३/०९/२०१४.**

महामंडळाच्या उपरोक्त परिपत्रकानुसार, माहिती तंत्रज्ञान उद्यान म्हणून घोषित केलेल्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडधारकांना माहिती तंत्रज्ञान प्रयोजनाव्यतिरिक्त (IT, ITES or IT PARK) इतर प्रयोजनाकरीता परवानगी दिली जात नाही. तसेच माहिती तंत्रज्ञान उद्यान घोषित होण्यापूर्वी ज्या भूखंडधारकांचे उद्योग चालू आहेत, तोच उद्योग पुढे चालु ठेवू शकतो आणि जर भूखंड हस्तांतर केल्यास तोच उद्योग तसेच पुढे चालू ठेवण्यास परवागनी दिली जाते. मात्र, माहिती तंत्रज्ञान व्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी भूखंड हस्तांतरण/सबलीज/पोटभाडे/वापरातील बदल या करीता परवानगी दिली जात नाही. तथापि, मरोळ या माहिती तंत्रज्ञान उद्यानामध्ये Gems & Jewellery चे बहुतांश कारखाने असल्याने मरोळ माहिती तंत्रज्ञान उद्यानातील इतर उद्योजकांच्या भूखंडावरील इमारतीलमधील बांधीव क्षेत्र मरोळ औद्योगिक क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या Gems & Jewellery उद्योगाच्या विस्तारासाठी पोटभाडे/सबलीज/हस्तांतरण करण्यास परवानगी देण्यात येते.

मरोळ ,ठाणे (वागळे इस्टेट) व टी टी सी औद्यौगिक क्षेत्र येथील माहिती तंत्रज्ञान उद्यानातील उद्योजकांकडून चालू उद्योग पुढे चालू ठेवण्यासाठी किंवा भूखंड/भूखंडावरील इमारतीमधील बांधीव क्षेत्र इतर औद्योगिक प्रयोजनासाठी हस्तांतरण/सबलीज/पोटभाडयाने देण्यास परवानगी मिळण्याची सातत्याने मागणी होत आहे. तसेच, महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाच्या Make in India च्या धर्तीवर Make in Maharashtra ही संकल्पना शासनाच्या विविध उपक्रमांमधून राबविण्यात येत आहे. त्याचा एक भाग म्हणून उद्योग विकासाला चालना देण्यात येत आहे. या बाबींचा विचार करता तसेच माहिती तंत्रज्ञानसाठीच्या भुखंडाकरीता, माहिती तंत्रज्ञान व्यतिरिक्त इतर उद्योगांकडून येणारी मागणी लक्षात घेता, उद्योगांना प्रोत्साहन तसेच उद्योग उभारणीस चालना देण्यासाठी तसेच शासन निर्णय क्र.आयएलपी-२०१३/प्र.क्र.११६/उद्योग-२ दिनांक २०/०६/२०१५ अन्वये मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रातील 'स्थान निश्चयन धोरण' (Industrial Location Policy) रद्द झाल्यामुळे, मरोळ ,ठाणे (वागळे इस्टेट) व टी टी सी औद्यौगिक क्षेत्र येथील महामंडळाच्या घोषित माहिती तंत्रज्ञान उद्यानातील भूखंड/भूखंडावरील इमारतीमधील बांधीव क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान व्यतिरिक्त इतर औद्योगिक प्रयोजनासाठी

हस्तांतरण/सबलीज/ पोटभाडयाने देणे तसेच वापरातील बदलास खालील अटी व शर्तींवर परवानगी देण्यात यावी.

१. महामंडळाने घोषित केलेल्या माहिती तंत्रज्ञान उद्यान क्षेत्रातील भूखंड धारकांच्या विनंतीनुसार भूखंडावर सध्या कार्यरत उद्योग पुढे चालू ठेवणे किंवा विद्यमान उद्योगांचा विस्तार करण्यासाठी तसेच उद्योगांना MPCB च्या White आणि Green Category मध्ये समाविष्ट उत्पादनासाठी औद्योगिक वापराच्या बदलास मंजूरी देण्यात यावी. महामंडळाच्या धोरणाप्रमाणे आवश्यक ते शुल्क वसुल करुन वरील औद्योगिक प्रयोजनाशी निगडीत हस्तांतरण/सबलीज/पोटभाडे इत्यादीसाठी परवानगी देण्यात यावी.

२. महामंडळाने घोषित माहिती तंत्रज्ञान उद्यानासाठी भूखंड किंवा माहिती तंत्रज्ञान वापरासाठी राखीव भूखंडावर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने वर्गिकृत केलेल्या Orange Category मध्ये समाविष्ट उद्योगांना माहिती तंत्रज्ञान ते औद्योगिक अशा वापरातील बदलास मंजुरी देण्यात यावी.

३. घोषित माहिती तंत्रज्ञान उद्यानात औद्योगिक घटक सुरु असेल अशा भूखंडावर व्यापारी, निवासी प्रयोजनासाठी हस्तांतरण/सबलीज पोटभाडे/उत्पादनातील बदलास परवानगी देण्यात येउ नये. तसेच माहिती तंत्रज्ञान ते व्यपारी, निवासी अशा वापरातील बदलास परवानगी देण्यात येवू नये.

४. ज्या उद्योजकांनी शासन व महामंडळाच्या धोरणानुसार, माहिती तंत्रज्ञान उद्योगांसाठी दिल्या जाणाऱ्या सवलतींचा लाभ घेतला असेल; अशा भुखंडांसाठी/गाळयांसाठी/इमारतींसाठी या परिपत्रकातील उत्पादन बदलाच्या तरतुदींचा लाभ घेता येणार नाही.

सदरहू धोरण यासंबंधाने प्रलंबित असलेल्या तसेच यापुढे प्राप्त होणा-या प्रस्तावांना लागू करण्यात येत असून याची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मंजूरीने निर्गमित करण्यात येत आहे.

(विक्रम कुमार)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मा/तं)
मऔविम, मुंबई

प्रत,

१. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केन्द्र (डब्ल्यु.टी.सी), कफ परेड, मुंबईसर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. विकास आयुक्त, उद्योग संचालनालय, मुंबई.
३. सह मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम.
४. सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मा/तं), मऔविम.
५. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
६. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
७. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
८. सर्व प्रादेशिक अधिकारी/सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.

९. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
१०. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
११. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
१२. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
१३. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१४. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१५. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१६. सर्व औद्योगिक संघटना.